दै सकाळ (1)

# महापालिकेसाठी चार लाख मतदार...

## गेल्या वेळेपेक्षा मतदार झाले कमी, मृत, स्थलांतरित, दुबार आदींची नावे वगळली, यंदा मतदानाचा टक्का वाढणार!

**नांदेड, ता. १८ (बातमीदार) :** नांदेड महापालिकेची येत्या आक्टोबरमध्ये निवडणूक होत असून त्यासाठी महापालिका हद्दीत चार लाख मतदारांची यादी तयार करण्यात आली आहे. गेल्या वेळेस २०१२ मध्ये झालेल्या निवडणुकीच्या वेळी चार लाख २३ हजार मतदार होते पण यंदाचा वेळेस स्थलांतरित, मृत तसेच दुसऱ्यांना आलेली नावे मतदारयादीतून वगळण्यात आली आहेत त्यामुळे चार लाख मतदार झाले आहेत. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढण्याचा अंदाज व्यक्त केला आहे.

नांदेड नगरपालिका आणि वाघाळा नगरपालिका एकत्र करून नांदेड वाघाळा महापालिकेची स्थापना ता. २६ मार्च १९९७ रोजी करण्यात आली. आक्टोबर १९९७ मध्ये पहिली निवडणूक घेण्यात आली. त्यावेळी एक सदस्यीय वॉर्ड होते त्यावेळी ६५ सदस्य होते. २००२ मध्ये दुसरी निवडणूक झाली त्यावेळी ६७ सदस्य होते आणि बहुसदस्यीय प्रभाग रचना होती.

२००७ मध्ये तिसरी निवडणूक झाली तेव्हा ७३ वॉर्ड होते आणि एक सदस्यीय निवडणूक झाली. २०१० मध्ये नांदेड महापालिकेत तरोडा खुर्द, बुद्रूक आणि ब्रह्मपुरीचा समावेश करण्यात आला आणि सहा जागा वाढल्या त्यामुळे ७९ सदस्य झाले. २०१२ मध्ये चौथी निवडणूक झाली त्यावेळी बहुसदस्यीय प्रभाग होते आणि ८१ सदस्य होते. आता २०१७ मध्ये महापालिकेची पाचवी निवडणूक होत असून ८१ सदस्य बहुसदस्यीय प्रभागातून निवडून द्यायचे आहेत.



त्यासाठी २० प्रभाग करण्यात आले असून १९ प्रभागातून प्रत्येकी चार तर एका प्रभागातून पाच सदस्य निवडून द्यायचे आहेत.

२०११ च्या जनगणनेनुसार नांदेड शहराची लोकसंख्या पाच लाख ५० हजार ४३९ एवढी असून त्यामध्ये अनुसूचित जातीची (एससी) एक लाख दोन हजार ६७७ तर अनुसूचित जमातीची (एसटी) १२ हजार ७३८ लोकसंख्या आहे. त्यानुसार आरक्षण तयार करण्यात आले असून आता येत्या आक्टोबर महिन्यात होणाऱ्या निवडणुकीसाठी ८१ सदस्य निवडून द्यायचे आहेत. त्यासाठी ता. पाच जानेवारी २०१७ ची नांदेड दक्षिण आणि नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघाची मतदार यादी ग्राह्य धरण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागातर्फे देण्यात आली.

### मतदार शोधमोहिमेनंतर कार्यवाही

**मागील वर्षी डिसेंबर २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या मतदार शोधमोहिमेंतर्गत मृत, स्थलांतरित, फोटो व रहिवासी पुरावा नसलेले तसेच दुबार नोंदणी असलेले किंवा चुकीचा पत्ता टाकून त्या ठिकाणी आढळून आले नसलेले असे जवळपास १८ हजार मतदार निघाले होते त्यामध्ये नांदेड उत्तरचे १२ हजार तर नांदेड दक्षिणचे जवळपास सहा हजार मतदार होते. अशा मतदारांना नोटिसा बजावून त्यांना फोटो आणि रहिवासी पुरावा मागितला होता. मात्र अनेकांनी तो सादर केला नाही. त्यामुळे त्याची खातरजमा झाल्यानंतर व कसून तपासणीनंतर सदरील जवळपास १८ हजार नावे वगळण्यात आल्याची माहिती निवडणूक विभागातर्फे देण्यात आली आहे.**

महापालिकेच्या गे
वेळेस २०१२ मध्ये झाले
निवडणुकीत चार लाख २३
मतदार होते आणि ५४
मतदान झाले होते त्यावेळी
सदस्य होते. २००७ मध्ये
लाख १२० मतदार होते आणि
टक्के मतदान झाले होते. त्य
७३ सदस्य होते. आता
मध्ये नांदेड महापालिका हद्दी
लाख मतदार आले असून
वेळच्या तुलनेने २३ हजार
आहे. निवडणूक आयो
सूचनेनुसार यंदा स्थल
झालेल्या मतदारांची तसे
झालेले, दुबार नोंदणी
तसेच फोटो नसलेले
वगळण्यात आले आहेत.
यंदाच्या वर्षी निवडणुकीच
मतदानाचा टक्का वा
शक्यता वर्तविण्यात आल

दै पुण्यनगरी (3)

## प्रभाग रचना व आरक्षणावर हरकती व सूचना

# आज शेवटचा दिवस

## सात दिवसांत ४४ आक्षेप दाखल

नांदेड, दि.१८: महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी जाहीर झालेल्या प्रभाग रचना व आरक्षणावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी आता शेवटचे ७ तास शिल्लक राहिले आहेत. दि. ११ ते १८ जुलै यादरम्यान मनपा आयुक्तांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये दाखल झालेल्या आक्षेपांची संख्या ४४ झाली आहे. बुधवारी (दि.१९) शेवटचा दिवस असल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आक्षेप दाखल होण्याची शक्यता आहे. येत्या २९ जुलै रोजी राज्य निवडणूक आयुक्त किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला वरिष्ठ सनदी अधिकारी यांच्यावतीने प्राप्त झालेल्या आक्षेपांवर सुनावणी घेऊन १० ऑगस्ट २०१७ पर्यंत निर्णय दिला जाणार आहे.



गेल्या दि. ६ जुलै २०१७ रोजी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करताना संबंधित प्रभागनिहाय आरक्षणाची सोडत काढण्यात आली. या सोडतीत एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चूक झाल्यामुळे ती दुरुस्त करण्यासाठी दि. १० जुलै २०१७ रोजी ओबीसी महिलांसाठी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. त्यानंतर पाच प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलले. प्रत्येक प्रभागात किमान एक जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी हमखास सुटल्यामुळे सोडतीचा सर्वांना सारखा लाभ झाल्याच्या भावना आहेत. त्यामुळे आरक्षण सोडतीवर दाखल होणाऱ्या आक्षेपांची संख्या अगदी तुरळक असून, सर्वाधिक आक्षेप प्रभाग रचनेच्या व्याप्ती व हद्दीबाबत दाखल झाले आहेत.

**रस्त्याऐवजी भिंतीपासून प्रभाग तोडला**

माजी उपमहापौर शमीम अब्दुला यांनी त्यांच्या प्रभागातील हद्दीबाबत आक्षेप घेतला आहे. दोन मालमत्तांच्या मध्यभागी असलेल्या रस्त्यापासून हद्द न तोडता त्याच्या शेजारी असलेल्या भिंतीला हद्द दाखविल्याने त्यांनी आक्षेप नोंदवला आहे. वास्तविक प्रमुख रस्ते, नाल्या, नद्या, कालवे, महत्त्वाची ठिकाणे लक्षात घेऊन तेथून प्रभागाची विभागणी करण्याच्या सूचना राज्य निवडणूक आयोगाच्या आहेत. प्रभाग क्र. १७ ची विभागणी चुकीची केल्यामुळे अनुसूचित जातीतील लोकसंख्येत वाढ होऊन चुकीच्या पद्धतीने आरक्षण निश्चित करण्यात आल्याचे त्यांनी आपल्या आक्षेपात म्हटले आहे.